INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

December-2019 Special Issue – 210

## साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप




**Guest Editor:**
Dr. Bhausaheb Game,
Principal,
MGV's Arts & Commerce College, Yeola
Dist. Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue:**
Prof. Raghunath Wakle
Dr. Gajanan Bhamare
Prof. Sharad Chavhan

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**December-2019 Special Issue – 210**

## साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप

**Guest Editor:**
**Dr.** Bhausaheb Game**,**
**Principal,**
**MGV's Arts & Commerce College, Yeola**
**Dist. Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editor of the issue:**
**Prof. Raghunath Wakle**
**Dr. Gajanan Bhamare**
**Prof. Sharad Chavhan**

**Chief Editor:**
**Dr. Dhanraj Dhangar**

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© **All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 800/-**

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**SPH Mahila Mahavidyalaya,**
**Malegaon, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**

- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh-** King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath-** Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar –** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, **Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **मराठी विभाग** | | |
| 1 | साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप | डॉ. एकनाथ पगार | 05 |
| 2 | साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप | डॉ. धनराज धनगर | 09 |
| 3 | इंटरनेट वरील समृद्ध मराठी साहित्य | डॉ. प्रकाश शेवाळे | 15 |
| 4 | बदलते तंत्रज्ञान व साहित्य व्यवहार | प्रा.योगिता भामरे | 21 |
| 5 | बदलते तंत्रज्ञान व साहित्य व्यवहार | श्री महेश कुलकर्णी | 26 |
| 6 | साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप : ब्लॉग लेखन | प्रा.विनोद भालेराव | 29 |
| 7 | ब्लॉग लेखन | प्रा. संदीप ठाकरे | 32 |
| 8 | साहित्याची बदलती आशयसुत्रे : चित्रपट | डॉ.गजानन भामरे | 34 |
| 9 | मराठी साहित्य व्यवहाराची बदलती प्रसार माध्यमे | प्रा. भारती सोनवणे | 36 |
| 10 | मराठी साहित्याचे बदलते स्वरूप | डॉ. शीला गाढे | 45 |
| 11 | १९९० नंतरचे मराठी कवितेचे बदलते स्वरूप | डॉ. भाऊसाहेब गमे | 47 |
| 12 | वाचन संस्कृतीतील बदलांचा परामर्श | डॉ. हेमराज बिरारीस | 52 |
| 13 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा. सुनिल खैरनार, डॉ. उज्वला देवरे | 55 |
| 14 | वाचन संस्कृतीतील बदल | डॉ. स्नेहल मराठे | 58 |
| 15 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा.पूनम वाघ | 61 |
| 16 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा.ए.जी.नेरकर | 64 |
| 17 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा.नंदा बैसाणे | 68 |
| 18 | वाचन संस्कृतीची बदलती माध्यमे | प्रा. विनोद केदारे | 71 |
| 19 | मराठी भाषा आणि विविध क्षेत्रातील संधी | प्रा.मोहन सौदर्य | 73 |
| 20 | जागतिकीकरणाचा मराठी भाषेवरील प्रभाव | डॉ. अरुण पाटील | 76 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 21 | साहित्य व्यवहार का परीवर्तित स्वरूप | प्रा. कैलास बच्छाव | 78 |
| 22 | हिंदी नाटक साहित्य का परिवर्तित स्वरुप वक्ता-श्रोता के संदर्भ में | डॉ. व्ही.डी.सूर्यवंशी | 80 |
| 23 | जनसंचार माध्यमों में हिंदी भाषा की परिवर्तित स्थिति | सोनू शेन्डे | 82 |
| 24 | संचार माध्यमों में हिंदी भाषा का परिवर्तित स्वरूप | प्रा.श्रीमती वृषाली वडगे | 85 |
| 25 | हिंदी साहित्य लेखन का परिवर्तित स्वरूप | डॉ.जालिंदर इंगळे, प्रा.संदीप देवरे | 88 |
| 26 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | डॉ.डी.बी.महाजन, प्रा.आर.एन.वाकळे | 90 |
| 27 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप विकासक्रम में | प्रा.बापू शेळके | 93 |
| 28 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरुप | प्रा. सविता मुंढे | 98 |
| 29 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | प्रा. जितेंद्र थोरात | 100 |
| 30 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | गणेश दिवटे | 105 |
| 31 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | प्रा. सविता तोडमल | 109 |
| 32 | हिदी काव्य साहित्य का परिवर्तित स्वरुप | डॉ. अनिता नेरे, डॉ. योगिता अपूर्व हिरे | 112 |
| 33 | ग़ज़ल साहित्य का बदलता स्वरुप | डॉ.जालिंदर इंगळे | 115 |
| 34 | सतसई या दोहावली का बदलता स्वरुप | प्रा.राजाराम शेवाळे | 118 |

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | समकालीन हिंदी कविता का बदलता स्वरूप | **दत्तात्रय किटाळे** | 122 |
| 36 | हिंदी भाषा का बदलता स्वरूप | **डॉ.विष्णू राठोड** | 126 |
| | **English Section** | | |
| 37 | Transgender Literature: A significant Transition in the Postmodern Literature | **Dr. Manisha Gaikwad** | 129 |
| 38 | A Contextual Study of ‘Reading habit’ and Reading Culture | **Prof. Kamalakar Gaikwad** | 133 |
| 39 | Emergence of Blog Writing and Study of Obstacles in it | **Prof. Sanjay Karanjkar** | 139 |
| 40 | Enhancing Environmental Literacy Through Literature | **Dr. Premal Deore** | 143 |
| 41 | Impact of Digitization on Reading Culture | **Dr. Deepanjali Borse** | 146 |


*Our Editors have reviewed papers with experts’ committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

ISSN : 2348-7143
December-2019

# साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप

**डॉ. धनराज तोताराम धनगर**
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, जि. नाशिक
भ्र. ७७७५९८२५३४

साहित्य व्यवहार ही तशी जुनी संकल्पना असली तरी तिचा समग्रतेने विचार झालेला आहे किंवा या विषयावर तात्विक मांडणी झालेली आहे असे मात्र आढळत नाही. त्यामुळे अशी संशोधनात्मक तात्त्विक मांडणी करण्याचा हेतू या शोधनिबंध लेखनामागे आहे. येथे मराठीतील साहित्य व्यवहाराच्या अनुषंगाने साहित्य व्यवहाराच्या बदलत्या स्वरूपाचा शोध घ्यावयाचा असल्याने शोधनिबंधाची तीन विभागात मांडणी केली आहे

१. **साहित्य व्यवहार : संकल्पना, स्वरूप, व्याप्ती**
२. **मराठीतील साहित्य व्यवहार**
३. **साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप : काही निरीक्षणे**

## साहित्य व्यवहार : संकल्पना, स्वरूप, व्याप्ती

साहित्य व्यवहार संकल्पनेत दोन पदे आहेत १. साहित्य आणि २. व्यवहार. यातील साहित्य हा शब्द इंग्रजीतील Literature किंवा संस्कृत वा मराठीतील रूढ वाङ्मय या अर्थाने आलेला आहे. हे आता सर्वमान्य आहे. जे जे बोलले जाते, वाणीमय, वाक्मय आहे ते वाङ्मय आहे आणि ते लिखित किंवा मौखिक अशा दोन्ही स्वरूपात अस्तित्वात येते. कमी किंवा दीर्घकाळासाठी ते अस्तित्वात राहते. अशा शब्द साहित्यासाठी साहित्य हा शब्द रूढ झालेला आहे. तसेच लोकसाहित्यामध्ये शारीर साहित्य किंवा अशाब्दिक साहित्य अशी ही एक संकल्पना आढळते. म्हणजे शब्दाविना केली जाणारी कृती ही देखील साहित्य संकल्पनेत येते उदाहरणार्थ. विधी, विधी नाट्य, मूकनाट्य वगैरे. यामध्ये शब्दांचा वापर केला जात नसला तरी त्या कृतीस निश्चित असा अर्थ असतो. याचा अर्थ सार्थ असणारी आणि शब्दांमध्ये वर्णन करता येणारी कृतीदेखील साहित्य ठरते. इथपर्यंत साहित्य ही संकल्पना विस्तारता येते.

साहित्य व्यवहार या संकल्पनेतील दुसरे पद हे 'व्यवहार' असे आहे. व्यवहार या शब्दाचा अर्थ अर्थशास्त्रीय परिभाषेत "जेव्हा वस्तू, सेवा किंवा रक्कम एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे जाते त्यास व्यवहार असे म्हटले जाते"[१] तर कै. वा.गो. आपटे यांच्या शब्दरत्नाकर मध्ये 'व्यवहार' या शब्दाचा अर्थ "परस्परांमधील देव घेव, व्यापार, कामकाज, धंदा, वर्तन, लोकरीती"[२] असा दिलेला आहे. यावरून 'साहित्य व्यवहार' ही संकल्पना अधिक स्पष्ट करता येईल. साहित्याची देवघेव, साहित्य व्यापार, साहित्य संदर्भाने होणारे वर्तन, किंवा साहित्य संबंधित असणाऱ्या लोकरीती या सर्वांचा समावेश 'साहित्य व्यवहार' या संकल्पनेत होईल. ही साहित्याची देवाण-घेवाण व त्यासंदर्भात होणाऱ्या कृती व व्यवहार कोणाकोणात चालतात? त्या कृती व व्यवहाराचे स्वरूप कसे असते? हे पाहणे म्हणजे 'साहित्य व्यवहार' या संकल्पनेची स्वरूप व व्याप्ती अधिक स्पष्ट करणारे ठरेल.

साहित्य व्यवहार हा मुख्यत्वे लेखक (निर्माता), वाचक, आस्वादक व समीक्षक (उपभोक्ता), प्रकाशक, वितरक, प्रचारक, प्रसारकर्ता (निर्माता व उपभोक्ता यांच्यामधील दुवा) या तीन घटकांमधील असला तरी या साहित्य व्यवहारावर समकाळाचा मोठा प्रभाव पडत असतो. या प्रभावातून लेखक आणि वाचक व प्रकाशन व वितरण व्यवहार सांभाळणारा हे तिन्हीही प्रभावित होत असतात. लेखाकाचे लेखक म्हणून असणारे व्यक्तिमत्व या व्यक्तिमत्वाची भावनिक व वैचारिक जडणघडण हा भाग महत्त्वाचा असतो. त्याच वेळेला वाचकांची अभिरुची देखील लेखक आणि त्याच्या साहित्यनिर्मितीवर प्रभाव पाडत असते. वाचकांची अभिरुची ही त्यांच्या

वाचनातून घडत असते तशीच समकाळाचा प्रभाव वाचकांच्या अभिरुचीला नियंत्रित करत असतो. (समकाळाचा प्रभाव ही एक बहुकेंद्री व व्यापक अशी संकल्पना आहे, उद्योग, व्यापार, समाजकारण, राजकारण, निसर्ग, भौतिक आणि अभौतिक घटक या व अश्या जीवनाच्या सर्वच पैलूंचा वर्तमान जीवनशैलीवर परस्परांच्या परिणामांचा होणारा परिणाम म्हणजे समकाळाचा प्रभाव असे म्हणता येईल ) लेखक आणि वाचक या दोघांना जोडणारा दुवा म्हणजे प्रकाशक, वितरक, प्रचारक, प्रसारकर्ता हे होत. यांचा व्यवहार हा मुख्यत्वेकरून आर्थिक बाबींशी संबंधित असल्याने सध्या काय खपतंय यावर यांची भूमिका ठरते. त्यादृष्टीने साहित्यिकांकडून लेखन करून घेणे, वाचकांपर्यंत पोहोचविणे, समाजापर्यंत पोहचविणे हा प्रकाशक, वितरक, प्रचारक, प्रसारकर्ता यांचा व्यवहार ठरतो. काही वेळेला विशिष्ट विचारांशी बांधिलकी ठेवून प्रकाशन करणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती तसेच लेखक व वाचकही असतात. मुख्यत्वे प्रचारकी साहित्याच्या संदर्भात तसा अनुभव येतो लेखक लिहितो प्रकाशक प्रकाशित करतो व वितरकांमार्फत ते वेगवेगळ्या मार्गांनी वाचकांपर्यंत पोहोचवितो. वाचक ते साहित्य वाचतो आणि आपापल्या गरजेनुसार व बौद्धिक, भावनिक आकलनानुसार त्यास प्रतिसाद देतो बऱ्याचदा हा प्रतिसाद दृश्य स्वरूपात असतो किंवा अदृश्य स्वरूपातही असतो. प्रतिसाद देण्याची कालमर्यादा निश्चित नसते. संस्कारांच्या रूपाने, विचारांच्या रूपाने वर्तनात होणारा बदल हा तात्कालिक असू शकतो किंवा दीर्घकालीनही असू शकतो. त्यामुळे प्रतिसाद हा तात्काळ किंवा उशिराने, काही वर्षांनीही दिला जाऊ शकतो किंवा संस्कारांच्या रुपाने तो पुढील पिढीपर्यंतही प्रसारित होऊ शकतो. हा प्रतिसाद आणि लेखकाला दिलेले प्रत्याभरण या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. या प्रतिसादाचा संबंध साहित्याच्या होणाऱ्या परिणामांशी संबंधित आहे साहित्यिकाला दिले जाणारे प्रत्याभरण (Feedback) हासुद्धा या साहित्य व्यवहाराचा एक भाग आहे. साहित्यिकाने लिहिलेल्या साहित्यकृती वाचणारे वाचक तसेच माध्यमांतराच्या माध्यामातून पाहणारे प्रेक्षक किंवा ऐकणारे श्रोते हे दोन प्रकारचे असतात (साहित्यकृतीचा सेंद्रीय अनुभव घेणारे); १. स्वतः वाचून (सेंद्रीय अनुभव) तो स्वतःपुरते ठेवणारे, २. स्वतः वाचल्यावर (सेंद्रीय अनुभवाचे) स्वतःला झालेले आकलन दुसऱ्यापर्यंत पोहोचविणारे यातील पहिल्या स्वरूपाच्या वाचकांना आपण आस्वादक असे म्हणतो तर दुसऱ्या प्रकारच्या वाचकांना आपण समीक्षक असे म्हणतो. थोडक्यात लेखन, प्रकाशन, माध्यमांतर, वाचन, आकलन, समीक्षण, परीक्षण, संस्कार हा साहित्य व्यवहाराचा व्यूह असा विस्तारत जातो. एका संस्कारातून नवीन संस्कार, नवनवे प्रवाह निर्माण होत जातात आणि साहित्य व्यवहार प्रवाहित राहतो. तो अनेकांगी व अनेक केंद्रीय असा विस्तारला जातो. समकालीन साहित्य व्यवहाराची मुळे पूर्वसुरींच्या साहित्यव्यवहारात असतात आणि समकालीन साहित्य व्यवहाराची वाढ आणि विस्तार समाजातून मिळणाऱ्या पोषक द्रव्यांवर ठरत असते. पूर्वसुरींच्या साहित्य व्यवहारावरील क्रिया-प्रतिक्रियांच्या रूपाने समकालीन साहित्य व्यवहार आकारास येत असतो. जसा तो नवनवीन प्रवाहांना जन्म देतो, तसा नवनवीन साहित्यप्रकारांना ही जन्माला घालत असतो. अशा नवनवोन्मेष स्वरूपा मुळेच साहित्यात परंपरा व नवता दोन्हींचा आढळ असतो. व या नवतेमुळेच परिवर्तन होत असते किंवा परिवर्तनालाच आपण नवता असे म्हणतो.

**मराठीतील साहित्यव्यवहार :**

एका विशिष्ट भाषेत साहित्य लिहिले जाऊ लागते तिथे भाषेची संप्रेषणावस्था अधिक उन्नत झाली आहे; असे मानले जाते. प्रात्यक्षिक संप्रेषण ऐवजी अप्रत्यक्ष संप्रेषणाला झालेली ही सुरुवात भविष्यात ती भाषा संवाद रूपाने अस्तित्वात नाही राहिली तरी साहित्य रूपाने अस्तित्वात राहतेच. परंतु लिखित साहित्य अस्तित्वात येण्यापूर्वीही मौखिक स्वरूपातील साहित्यव्यवहार सुरू झालेला असतो. मराठीतील साहित्य व्यवहाराचा विचार करता ही मौखिक परंपरा अतिप्राचीन काळापासून अस्तित्वात असावी असे लक्षात येते. लोकसाहित्याच्या रूपाने ती प्रवाहित असलेली दिसते. मराठीतील लिखित साहित्य व्यवहार हा आद्य ग्रंथकार मुकुंदराज यांच्यापासून सुरु झालेला दिसतो. तो काळ अध्यात्मिक, धार्मिक आणि सांप्रदायिक विचारांच्या प्रभावाखाली असल्याने अध्यात्मिक, धार्मिक आणि सांप्रदायिक अभिव्यक्ती या साहित्यातून झालेली दिसते. महानुभावीयांनी लिहिलेल्या वाङ्मयात टीकाभाष्ये, महाभाष्ये, प्रमेये, प्रकरणे, स्पष्टीकरणे, स्थळग्रंथ, दीपग्रंथ, लक्षणग्रंथ असे विविध प्रकारचे गद्य आहे. त्याबरोबरच मराठीला गद्य साहित्याच्या रूपाने वेगळे वळण

महानुभाव साहित्याने त्याकाळात दिले. या लेखनाविषयी र. बा. मंचरकर लिहितात, "महानुभावांनी मराठीला धर्म बनवण्याची प्रतिष्ठा दिली; त्यामुळे लोकजीवनाशी समरस होऊन त्यांनी मराठीबद्दल लिहिले. पंचकृष्णाविषयी स्मरणशक्ती व उपासना हीच या वाङ्मयाची प्रेरणा होती. त्यातून चरित्र, पुजावसर, दैनंदिनी, स्थानपोथी, स्थळवर्णने, मूर्तीवर्णने यासारखे सकस गद्य लिहिले."[३] म्हणजेच धर्म, धर्मभावना व लोकजीवन यांचा घनिष्ठ संबंध या काळात दिसतो. त्याचाच धागा पकडून वारकरी संत चळवळीचे साहित्य या काळात निर्माण झालेले दिसते. सांप्रदायिक विचार आणि भक्ती-साधना यावर आधारित असलेली ही कविता आंदोलनाची कविता ठरते; कारण परधर्मी आक्रमकांच्या आणि परचक्राच्या भीतीच्या सावटाखाली ती लिहिली गेली आहे. या काळातील साहित्य व्यवहाराविषयी र. बा. मंचरकर यांनी नोंदविले या कवितेचे पर्यावरण येथे पाहणे महत्त्वाचे ठरेल. ते म्हणतात, "सामाजिक क्षेत्रात विषमता मुलक जातिव्यवस्था, आर्थिक क्षेत्रात वतनदारी, राजकीय क्षेत्रात अनियंत्रित लोकशाही आणि या सर्वांवर धर्म संस्थेचे नियंत्रण हे संत कवितेचे पर्यावरण होते."[४] म्हणूनच सामाजिक समतेची, मानवतेची शिकवण देणाऱ्या आणि धर्म रक्षणासाठी चालविलेल्या चळवळीचे स्वरूप संत कवितेला लाभले. 'कूळ, जाती, वर्ण हे आघवेचि गा अकारण' याच विचारांनी हा संप्रदाय या मातीत रुजला व बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत व आजतागायत या साहित्याने महाराष्ट्राला वेड लावले. पंडिती साहित्याच्या बाबतीत अध्यात्मिकता, धार्मिकता असली तरीही संस्कृतप्रचुरता आणि पांडित्याचा सोस यामुळे सर्वसामान्य माणसापासून ही कविता दूर गेली व सांप्रदायिक किंवा धार्मिक आशय असूनही तिला संघटन किंवा चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही. ती काही मर्यादित लोकांपुरतीच राहिली. शाहिरांची कविता लावणी व पोवाड्यांच्या माध्यमातून, लोकबोलीतून लोकलयींच्याद्वारे प्रकटली; त्यामुळे ती जनसामान्यात लोकप्रिय झाली. परंतु पोवाडे फक्त राजाश्रायावर आणि लावणी लोकाश्रयावर वाढली. त्यामुळे राजेशाही संपुष्टात येताच पोवाडा कालबाह्य झाला; लावणी मात्र आजतागायत टिकून आहे. या साहित्य व्यवहाराच्या संदर्भाने ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव यांचे मत पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, "जगाचा इतिहास राजेशाहीकडून लोकशाहीकडे प्रवास करताना दिसतो. त्याबरोबर जगातील ललित साहित्यही राजेशाहीकडून लोकशाहीकडे प्रवास करताना दिसते. भारतापुरते उदाहरण घ्यायचे झाल्यास प्राचीन संस्कृत वाङ्मयात राजा किंवा राजपुत्र हीच संस्कृत वाङ्मयातील नायक दिसतात. त्यानंतर एखाद्या संस्कृत नाटकात एखादा ब्राह्मण क्वचितच नायक झालेला दिसतो. मध्ययुगीन काळात संत साहित्याचा नायक खुद्द परमेश्वरच होता. पंडिती वाङ्मयही परंपरावादीच होते. ब्रिटिश आमदानीमध्ये भारताला हळूहळू लोकशाहीचा स्पर्श झाला. युरोपात तपूर्वीच लोकशाही आली होती भारताच्या स्वातंत्र्य पूर्वकाळात मराठी साहित्यात प्रामुख्याने मध्यमवर्गातील ब्राह्मण समाजाचे प्रतिनिधित्व करणारे साहित्य निर्माण होत होते. स्वातंत्र्योत्तर काळात जनजाती जागृत होऊ लागल्या आणि त्यांच्या साहित्याचे नायक त्यांच्या समाजातून निर्माण होऊ लागले."[५] आनंद यादवांनी मांडलेले हे आकलन शाहिरी वाङ्मयाला व त्यानंतर उदयास आलेल्या आधुनिक मराठी साहित्याला तंतोतंत लागू होते. येथे एक गोष्ट ध्यानात घ्यावी लागेल की, शिक्षणाचा प्रभाव साहित्य व्यवहारावर झाला. राजेशाही कडून मूल्यव्यवस्था, समाजव्यवस्था लोकशाहीकडे परावर्तित होत असताना साहित्य व्यवहार देखील अधिकाधिक लोकाभिमुख झाला.

मध्ययुगातून आधुनिक युगात प्रवेश करत असताना सुरुवातीला वैचारिक वाङ्मय निर्माण झाले. साहित्यातून प्रबोधन युग अवतरले. पाश्चात्त्य साहित्य आणि संस्कृतीच्या प्रभावाने हे नवे साहित्य आकार घेत होते. फुले, चिपळूणकर, लोकहितवादी, आगरकर व पुढे गांधी-आंबेडकर, मार्क्स यांच्या तत्त्वप्रनालींनी केवळ वैचारिक गद्य निर्माण केले नाही; तर ललित साहित्याच्या माध्यमातूनही त्यांचे विचार प्रवाहित होत राहिले. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, हरिभाऊ आपटे, केशवसुत, मर्ढेकर व पुढील काळातही साठोत्तरी साहित्यतूनही आपणास याची प्रचिती येते. केशवसुतांची सौंदर्यवादी, इंग्रजी वळणाची भावकविता किंवा मर्ढेकर, नारायण सुर्वे, अरुण कोल्हटकर यांची आधुनिक संस्कृती, यंत्र संस्कृती व शहरीकरणात अडकलेल्या माणसाची कविता, आंबेडकरवाद, मार्क्सवाद यांचा आधार घेत सर्वंकष नकार आणि विवेक, विज्ञान, इहवादाचा स्वीकार करून भेदाभेद, कर्मकांड, शोषणाला लाथाडून मुक्तिबोध, ढसाळ, नारायण सुर्वे, विंदा करंदीकर, यशवंत मनोहर अशी प्रवाहित राहिली. अधिकाधिक मानवतावादी झाली. या नवीन कवितेचे स्वागत करणारा मोठा राष्ट्रीय आणि

आंतरराष्ट्रीय ही वाचक वर्ग निर्माण झाला. अण्णाभाऊ आपल्या कथांमधून थेट रशिया पर्यंत पोहोचले. मराठीतील साहित्य व्यवहार असा विस्तारत गेला. कलावादाकडून जीवनवादाकडे हा साहित्याचा प्रवास होता. १९६० नंतर दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, कामगार, मुस्लीम, ख्रिश्चन, जैन, आदिवासी असे अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले. कोणत्या ना कोणत्या प्रकारची कोंडी, कुचंबणा, अन्याय, उपेक्षा, शोषण याविरुद्ध नकार आणि विद्रोहाचे शस्त्र घेऊन हे साहित्य निर्माण झाले. या साहित्याने चळवळी उभ्या केल्या. समतामूलक, शोषणरहित समाज निर्मिती हे या साहित्याचे व साहित्यव्यवहाराने निर्माण झालेल्या चळवळीचे ध्येय होते. कविता, कथा, स्वकथन, जलसा, नाटक असे या साहित्य प्रवाहाचे स्वरूप राहिले. समग्र परिवर्तन हाच या साहित्यव्यवहाराचा कणा होता. "इहवादी, राष्ट्रवादी आणि पुरोगामी अशा वळणांनी मराठी साहित्य प्रवाहित राहिले."[६] १९७० ते १९९५ हा या साहित्यप्रवाहांच्या धामधुमीचा काळ होता. या साहित्य प्रवाहांनी संमेलने, व्यासपीठे, प्रतिष्ठाने, संस्था जन्माला घातल्या. वेगळ्या चुली मांडल्याचे आरोप त्यांच्यावर झाले. पूर्वसूरींशी संघर्ष करत आणि त्यांचे दोष दाखवून देत; हक्क आणि कर्तव्यांची जाणीव असलेले नवीन लोकशाहीवादी मूल्यव्यवस्था रुजवण्याचे व सक्षम लोकशाही घडविण्याचे श्रेय या प्रवाहांना द्यावे लागेल.

नव्वदोत्तर कालखंडात पुन्हा या मराठी साहित्याने कूस बदलली. जागतिकीकरणाच्या प्रभावाने नव्या जीवन जाणिवा या साहित्यातून प्रवाहित होऊ लागल्या. वैचारिकतेचे भौगोलिक परिप्रेक्ष्य बदलामुळे लेखन, वाचन, साहित्यव्यवहाराचेही स्वरूप बदलत गेले. जगण्याचे अनेक स्तरीय पदर समोर आले. त्यांना यथोचित न्याय देण्याचे आव्हान या साहित्यीकांपुढे उभे ठाकले. भाषेच्या अस्तित्वाचे प्रश्न निर्माण झाले. बदललेल्या आर्थिक व्यवहाराचा परिणाम भाषिक व्यवहारावरही झाला. पर्यायाने तो साहित्य व्यवहारावरही झाला. मॉल्स, कम्प्युटर, इंटरनेट, मोबाइल, फेसबुक, व्हाट्सअप, टीव्ही चॅनल्स या सर्वांचा सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही अंगांनी विचार करावा लागेल. माध्यमांतराच्या माध्यमातून साहित्य व्यवहाराचे नवीन पर्याय उपलब्ध झाले. वसंत आबाजी डहाके, रंगनाथ पठारे, प्रशांत दळवी, किरण पोत्रे, सतीश तांबे, जयंत पवार, आसाराम लोमटे, प्रज्ञा पवार, किरण काळे, किरण येले अशी बरीच नावे घेता येतील त्यांच्या साहित्यातून या नव्या साहित्य व्यवहाराच्या स्वरूपाची, नव्या भाषेचे, नवीन जीवन जाणिवांचे दर्शन घडते.

**साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप : काही निरीक्षणे**

१. लेखन कला अवगत होण्यापूर्वी साहित्य व्यवहार मौखिक होता. लिपींचा शोध लागण्यापूर्वी तो चित्रात्मक स्वरूपात अस्तित्वात आला. लिपी आणि लेखन कला अवगत झाल्यावर उपलब्ध साधनांनूसार दगडावर, भूर्जपत्र, ताडपत्र, विविध धातूंचे पत्रांवर, पासोडीवर लेखन होत असल्याचे आढळते. छपाई यंत्राचा शोध लागण्यापूर्वी हातांनी नकला तयार करून साहित्य जतन केलं जात होतं, तसेच या साहित्याचे स्वरूप मुख्यतः अध्यात्मिक, धार्मिक, सांप्रदायिक होते, मौखिक, क्वचित दृश्यात्मक अशी ही संत कविता या सुरुवातीच्या काळात लिहिली गेली. कीर्तन, प्रवचने, भारुडे सादरीकरण ही या साहित्य व्यवहाराची माध्यमे होती. संत साहित्य हे अधिक लोकाभिमुख होते. भक्ती आणि अध्यात्माच्या माध्यमातून लोकशाहीयुक्त हा साहित्य व्यवहार होता. त्यानंतर आलेल्या पंडिती साहित्याचा वाचक वर्ग मर्यादित होता. शिवकाळात व पेशवाईत शाहिरी काव्य भरभराटीला आले. राजाश्रयाने पोवाडे आणि लोकश्रयाने लावण्या लिहिल्या गेल्या. तमाशासारखी लोककला विकास पावली.

२. आधुनिक काळातील साहित्य व्यवहाराचा विचार करता इंग्रजी राजवटीने छपाईयंत्र, वर्तमानपत्रे या नवीन गोष्टी महाराष्ट्राला परिचित झाल्या. छपाई यंत्रामुळे पद्यात्मक साहित्याऐवजी गद्यात्मक साहित्यनिर्मितीला चालना मिळाली. निबंध वाङ्मय लिहिले जाऊ लागले. शिक्षणाचा प्रसार, सार्वत्रिक शिक्षण याचा परिणाम साहित्यव्यवहारावर झाला. नवीन वाचन संस्कृती उदयास आली. अठरापगड जातीतील लोक वाचू लागले, लिहू लागले. तरी स्वातंत्र्यपूर्व काळात ब्राह्मणेतर जातीतील लिहिणारी नावे नगण्यच म्हणावी लागतील.

३. स्वातंत्र्योत्तर काळात संविधानाने आणलेली समानता आणि न्यायाची व विकासाची समान संधी, त्यामुळे जागृत झालेले उपेक्षित वर्ग यांच्या साहित्याचे नवीन संसार उदयास आले. प्रस्थापित मराठी

ISSN : 2348-7143
December-2019

साहित्यालाही अनुभवविश्व व भाषा नवीन होती. प्रस्थापितांकडून त्यास विरोधही झाला. आक्रस्ताळेपणाचे आरोपी झाले; परंतु चळवळीचे रूप धारण करून हे साहित्य दमदारपणे उभे राहिले. याचा वाचक वर्ग वेगळा होता. अब्राह्मणी साहित्याला प्रस्थापित मराठी साहित्याचे ब्राह्मणी सौंदर्यशास्त्र लावून समीक्षा करता येऊ शकत नाही हा नवीन विचार पुढे आला. त्यातून अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र, आंबेडकरवादी समीक्षा पद्धती, समीक्षा पद्धती, परिवर्तनवाद, उदारमतवाद, मानवतावाद या आधारावर साहित्याचे मूल्यांकन होणे या पारंपरिक साहित्य व्यवहाराच्या बदलत्या स्वरूपाचे दर्शन घडविते. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, अल्पसंख्यांक, अगदी किन्नर विमर्श पर्यंत वेगळ्या जीवनानुभूती, वेगळे जीवनदर्शन मांडतात.

४. नव्वदोत्तर कालखंडात खाऊजा धोरण, मोबाईल क्रांती, इंटरनेट, व्हाट्सअप, फेसबुक याद्वारे साहित्याव्यवहाराचे हे अवकाश अधिक विस्तारले. या कालखंडात प्रकाशन संस्था पुणे मुंबई पर्यंत मर्यादित न राहता त्या लहान शहरांपर्यंत पोहोचल्या; त्यामुळे प्रकाशन व्यवहार अधिक सोपा झाला. तंत्रज्ञान क्रांती, संगणक, मोबाईल, इंटरनेटक्रांतीमुळे जगातील अगाध ज्ञान बोटांच्या क्लिकवर आले तेथे साहित्यव्यवहार मागे कसा राहणार? ऑनलाईन वर्तमानपत्रे, नियतकालिके, ब्लॉग लेखन यामुळे साहित्यव्यवहार अधिक सुलभ आणि स्वस्त झाला. मराठी माणूस जगाच्या कानाकोपऱ्यात गेला तसे मराठी साहित्यही जगाच्या कानाकोपऱ्यात गेले. अनुवाद, माध्यमांतर यामुळे साहित्याचे विश्व अधिक विस्तारित झाले. इतर भाषिक लोकांपर्यंत पोहोचणे सोपे झाले. जुन्या साहित्यकृतींवर सिनेमे आले त्यामुळे या साहित्यकृती नव्या पिढीला माहीत झाल्या, जुन्यांना नव्याने नव्या रूपात पाहता आल्या. साहित्य व्यवहाराचे स्वरूप लेखक, वाचक, प्रकाशक, समीक्षक, दिग्दर्शक, निर्माता, प्रेक्षक, संगीतकार, अभिनेते असं बदलत गेलं; अधिक व्यापक होत गेलं.

५. सध्या व्हाट्सअप, फेसबुक वरून व्यक्त होणारे साहित्यिक वाढले आहेत. त्यांचे वाचकही वाढले आहे. गुणवत्तेचा प्रश्न यानिमित्ताने विचारला जाऊ शकतो; परंतु प्रत्येक काळात माध्यमे बदलली तरी चांगलं लिहिणारे मोजकेच असतात आणि त्यांना प्रतिसाद देणारे सुज्ञ वाचक, आस्वादक सुद्धा मोजकेच असतात. बाकीची भाऊगर्दी ही आभासी दुनियेसारखी (Virtual) असते. काही प्रमाणात या गर्दीचा परिणाम होत असला तरी अस्सल तेच टिकतं हाच अनुभव आहे. मात्र काळानुसार बदलणं जमलं नाही आणि कालाय तस्मै नमः म्हटले नाही तर कालबाह्य होण्याचा धोका असतो हे आपण मान्य केलेच पाहिजे. व्हाट्सअप, फेसबुक ही माध्यमे आहेत साहित्यिकाने स्वतःच्या वाढीसाठी, अधिक लोकांपर्यंत पोहचण्यासाठी त्याचा वापर करण्यात काही गैर नाही. परंतु त्यातून होणारी कंपूशाही आणि न वाचताच लाईक आणि शेअर, फॉरवर्ड करणाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ, त्यामुळे हुरळून जाणारे उदयोन्मुख साहित्यिक, पुरस्कारांची वाढलेली संख्या आणि त्यासाठी होणारा बाजार हा देखील या साहित्य व्यवहारातील चिंतेचा विषय आहे. पण अश्या कोणत्याच गोष्टीमुळे साहित्यिक मोठा होत नसतो किंवा वाचक, समीक्षकालाही तो सन्मान मिळत नसतो.

साहित्य व्यवहारातील महत्वाची बाब असते ती 'संवेदनक्षमता'. ही संवेदनक्षमता साहित्यिकात जेवढी उत्कट, तीव्र, सूक्ष्म तेवढे उच्च प्रतीचे साहित्य तो निर्माण करतो आणि ही संवेदनक्षमता रसिकाजवळ जेवढी उत्कट, तीव्र, सूक्ष्म तेवढी त्याची साहित्यकृतीला भिडण्याची, समजून घेण्याची, आस्वाद घेण्याची क्षमता अधिक असते. साहित्य हे वाचण्यासाठी नसतेच तर ते अनुभवण्यासाठी असते. साहित्य असे अनुभवता आले पाहिजे. गो. म. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे "कलानिर्मितीमध्ये कलावंत एका ठिकाणाहून दुसऱ्या बिंदूपर्यंत पोचतो (कलाकृती हा तो बिंदू). तर रसिक हा त्या बिंदूपासून उलट्या क्रमाने कलावंताच्या मूळ ठिकाणापर्यंत जाऊन भिडतो. जेथे कलावंताचे कार्य संपते तेथे रसिकाचे कार्य सुरु होते."[७] अश्या प्रकारे खरा साहित्यव्यवहार हा साहित्यिक (निर्माता) व रसिक यांच्यातच असतो. माध्यमे कोणतीही असू शकतात. बदलत्या साहित्य व्यवहारात या मूळ व्यवहाराला धक्का न लागणे साहित्यकलेला अक्षर आणि अभंग करणारे ठरेल अन्यथा Arthur Danto च्या End of Art Theory[८] प्रमाणे साहित्यकला देखील आधुनिकीकरणात तग धरू शकणार नाही हे साहित्य व्यवहाराशी संबधित असणाऱ्यांनी समजून घेतले पाहिजे.

**संदर्भ सूची :**


१. https://mr.m.wikipedia.org/wiki/आर्थिकव्यवहार दि. ११.१२.२०१९.
२. आपटे वा. गो. - मराठी शब्द रत्नाकर, धावले प्रकाशन मुंबई, सुधारित आवृत्ती फेब्रुवारी २०१३, पृ. ६४६.
३. मंचरकर (डॉ.) र. बा. - सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य, पद्मगंधा पकाशन, पहिली आवृत्ती, प्रस्तावना-पृ.२८.
४. तत्रैव - पृ.३१
५. यादव आनंद - १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती मार्च २००१, प्रस्तावना-पृ. ५.
६. मंचरकर (डॉ.) र. बा. - सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य, पद्मगंधा पकाशन, पहिली आवृत्ती, प्रस्तावना-पृ.३३.
७. कुळकर्णी अ. वा. - साहित्यविचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १५ जुलै १९९७, पृ. ५९
८. https://en.wikipedia.org/wiki/Arthur_Danto#The_end_of_art दि. १९.१२.२०१९